नमस्कार,

कोल्हापूर विभागीय सहसंचालक कार्यालयाचे गतिमान व पारदर्शी प्रशासनाचा उत्कट अनुभव आज आला. माझ्या महाविद्यालयातील काल 31 डिसेंबर 2025 रोजी सेवानिवृत्त झालेले ग्रंथालय परिचर रामचंद्र रेडेकर यांचा भविष्य निर्वाह निधी व पीपीओ चे प्रकरणाची आज विना विलंब निर्गत करून सदरची कागदपत्रे आज दि. ०१. ०१. २०२६ रोजी मा. बच्छाव साहेब यांनी स्वतः फोन करून माझ्या हाती सुपूर्द केली. या तृतीय श्रेणी कर्मचाऱ्याला सेवानिवृत्त झालेल्या लगतच्या महिन्यापासूनच पेन्शन सुरू होईल इतके गतिमान काम सहसंचालक कार्यालयाने पार पाडलेले आहे. मा. बच्छाव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सुशांत लाड व श्रीमती एस एस लाड यांनी अत्यंत तत्परतेने सेवानिवृत्ती प्रकरणांची निर्गत करून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास एक सुखद धक्का दिलेला आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या वतीने विभागीय सहसंचालक मा. बच्छाव साहेब व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार. सर आपल्या कार्यालयाचे काम वाखाणण्याजोगे व महाराष्ट्रात दिशादर्शक ठरेल यात शंका नाही. आपल्या गतिमान व पारदर्शी प्रशासनाचा हा एक उत्तम नमुना आहे. आपले पुन्हा एकदा मनःपूर्वक आभार.

🙏🙏🙏🙏

प्राचार्य डॉ उदय शिंदे

कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य व शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी

